# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे — ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## सुधारित परिपत्रक क्र. २४३/२०२४

**विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी विकास निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्ती व्यवस्थापन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थेत विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे **दि. २५ ऑक्टोंबर, २०२४** पूर्वी विद्यापीठास पाठविण्यात यावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना, खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) सर्व विद्याशाखेतील सर्व प्रगत अभ्यासक्रम (पूर्वीचे पदविका), पदवी, पदव्युत्तर व पीएच्. डी. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठ हिस्सा मुद्दा क्र. ५ मध्ये नमूद शुल्क तक्त्यानुसार पाठवावा.

२) ऑनलाईन प्रो—रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया बी.ओ.डी. पोर्टल अंतर्गत दिली आहे. **BOD Login** मध्ये 'प्रो—रेटा ऑनलाईन' ही लिंक वापरून सदरची माहिती भरावयाची आहे.

३) ऑनलाईन पध्दतीमध्ये सर्व विभागांसाठी एकत्रित चलन काढावयाचे आहे. चलनाची विद्यापीठ प्रत जमा करताना मूळ प्रत (बॅकं शिक्का असलेली) शैक्षणिक प्रवेश विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह शैक्षणिक प्रवेश विभाग येथे जमा करावी. तसेच शिक्का असलेल्या चलनाच्या छायांकित प्रती विद्यापीठ क्रीडा मंडळ व विद्यार्थी कल्याण मंडळ येथे त्या—त्या विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह जमा कराव्यात. चलन काढताना सर्व अभ्यासक्रमांचे मिळून एकच चलन काढावे. **प्रत्येक अभ्यासक्रमाचे वेगवेगळे चलन काढण्याची आवश्यकता नाही.**

**विशेष सूचना :**

१) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रमांक PGS/676, Dt. 28.2.2020 नुसार विद्यापीठास पाठवायचा आहे.

२) अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) वाढीव शुल्क क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संदर्भ पत्र क्र. विक्रीमं/३/६७९६, दि. २० ऑक्टोंबर, २०२३ अन्वये घेण्यात येत आहे.

३) रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क हे राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचे संदर्भ पत्र क्र. रासेयो/२०२४—२५/१८७, दि. २०/०८/२०२४ अन्वये घेण्यात येत आहे.

४) व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क व्यावसायिक दरानुसार पाठवावे.

५) परदेशी/सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्र. आयएससी/१०५० व १०५०—ए, दि.९ जून, २००८ नुसार पाठवावा.

६) नियमित प्रवेशित प्रती विद्यार्थ्यांमागे रु. १५/— प्रमाणे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचा (उदा. पुणे शहर/अहमदनगर/पुणे जिल्हा/नाशिक) देय असलेला प्रो—रेटा संबंधित विभागीय समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रो—रेटा न भरल्यास संबंधित महाविद्यालयातील/परिसंस्थेतील खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. (टिप — वरील बाबतचे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांचे जावक पत्र क्र. UBS/PRORATA/३.१/००४४, दि. २८ ऑगस्ट, २०२४ नुसार कार्यवाही करावी).

५) **शुल्काचा तक्ता**

| अ.क्र. | विभाग | निधी/शुल्काचे शिर्षक | अभ्यासक्रम | विद्यापीठ हिस्सा रु.मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | व्यावसायिक अभ्यासक्रम | | अव्यावसायिक अभ्यासक्रम |
| | | | | पदवी | पदव्युत्तर | |
| १ | विद्यार्थी विकास मंडळ | विद्यार्थी विकास निधी | पदवी व पदव्युत्तर | ४० | २० | ४० |
| | | विद्यार्थी सुरक्षा विमा निधी | पदवी व पदव्युत्तर | २० | | २० |
| | | आपत्ती व्यवस्थापन निधी | पदवी व पदव्युत्तर | १० | | १० |
| २ | राष्ट्रीय सेवा योजना | रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २० | | २० |
| ३ | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ जिमखाना शुल्क | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| | | अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) | पदवी व पदव्युत्तर | २६ | | २६ |
| | | कॉर्पस फंड | पदवी व पदव्युत्तर | ०४ | | ०४ |
| | | स्पोर्टस फंड ( FIT India ) | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| ४ | शैक्षणिक प्रवेश विभाग | नोंदणी शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | संगणक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | विकास निधी | पदवी व पदव्युत्तर | ५० | | २५ |
| ५ | आरोग्य केंद्र | विद्यार्थी आरोग्य सेवा योजना | पदवी | २० | | २० |

वरील सूचना विचारात घेऊन शुल्क/निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/३१२५
दिनांक : ०४/१०/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, विद्यार्थी विकास, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. आरोग्य अधिकारी, आरोग्य केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.